# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.१४४/२०२३/अहिल्यानगर**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. राजेंद्र बाबासाहेब शिंदे रा. मु. पो. शेंडी, ता. जि. अहिल्यानगर. | तलाठी, तलाठी कार्यालय, शेंडी, ता. जि. अहिल्यानगर | मंडळ अधिकारी, मंडळ अधिकारी कार्यालय, कापुरवाडी, ता. जि. अहिल्यानगर. |

**सुनावणी दिनांक –१८/१२/२०२५**

**१. उपस्थिती –**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | उपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |

**२. द्वितीय अपील अर्ज –**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : २८/१२/२०२२

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती मिळाली नाही.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळावी.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ३०/०८/२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ३०/०८/२०२२

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : कोणताही कालावधी नमुद केलेला नाही.

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :** आपल्या कार्यालयामार्फत केली जाणारी कामे ७/१२ फेरफार उतारा, फेरफार नोंदी या साठी लागणारा कालावधी, लागणारी फी (शुल्क) या दस्त नोंदणीसाठी लागणारा कालावधी व फी (शुल्क) याबाबत माहिती.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय शेंडी, ता. जि. अहिल्यानगर, यांनी कोणतीही कार्यवाही केली असल्याचे दिसून येत नाही.

**४. प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ०३/१०/२०२२

(२) प्रथम अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०३/१०/२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती मिळाली नाही.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी, मंडळ अधिकारी कार्यालय, कापुरवाडी, ता. जि. अहिल्यानगर, यांनी दिनांक १०/१०/२०२२ रोजी सुनावणी घेऊन त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी सदरचा आदेश प्राप्त झालेचे दिनांकापासुन ०७ दिवसांत अपिलार्थी यांना समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने आवश्यक कागदपत्रांसह माहिती विनामुल्य पुरवावी असे नमूद करून प्रथम अपील निकाली काढण्यात आले असल्याचे दिसून येते.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा –**

- **तत्कालीन जन माहिती अधिकारी –** दिनांक १८/१२/२०२५ रोजी आयोगास लेखी खुलासा सादर केला असुन त्यामध्ये असे नमुद केले आहे की, तत्कालीन तलाठी मौजे शेंडी सौ. एन. जे. शिरसाठ विनंती पुर्वक अर्ज करीते की, सदर अपिलार्थी राजेंद्र बाबासाहेब शिंदे यांना प्रथम अपिलीय अधिकारी यांचेसमोर तोंडी उत्तर दिले असून प्रथम अपिलीय अधिकारी यांना अर्जाद्वारे नमुद केले आहे सदर अपिलार्थी यांना माहिती दिलेली आहे.
- **प्रथम अपीलीय अधिकारी** –दिनांक १०/१०/२०२२ रोजी सुनावणी घेऊन आदेश पारित केलेले आहेत.

**६. निष्कर्ष –**

(१) अपिलार्थी यांच्या माहिती अर्जात माहितीशी संबंधित कालावधी नमुद केलेला नसल्यामुळे माहितीचा अर्ज हा मोघम स्वरुपाचा ठरतो.

(२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय शेंडी, ता. जि. अहिल्यानगर, यांनी अपीलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही केली असल्याचे दिसून येत नाही. परंतु आयोगास सादर केलेल्या दि. १८/१२/२०२५ च्या पत्रात प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या समोर तोंडी माहिती दिली असल्याबाबत नमुद केलेले असल्याचे दिसून येते.

(३) तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी, मंडळ अधिकारी कार्यालय, कापुरवाडी, ता. जि. अहिल्यानगर. यांनी अपीलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने दि. १०/१०/२०२२ रोजी सुनावणी घेऊन त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी सदरचा आदेश प्राप्त झालेचे दिनांकापासुन ०७ दिवसांत अपिलार्थी यांना समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने आवश्यक कागदपत्रांसह माहिती विनामुल्य पुरवावी, असे आदेश पारित केले असल्याचे दिसून येते.

(४) अपिलार्थीस अद्यापही माहिती अप्राप्त असल्याचे दिसून येते.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

(१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय शेंडी, यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ३०/०८/२०२२ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपिलार्थी यांना पाठवावे.

(२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय शेंडी, यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा १५ दिवसांत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

(३) प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.१४४/२०२३/अहिल्यानगर निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

**जावक क्र.** ९८०९e

10 MAR 2026